| | |
|---|---|
| MHKO100002972010 | **नियमित दिवाणी दावा क्र.९७/२०१०**<br>**निशाणी क्रमांक ७४ वरील आदेश**<br><br>**( श्री.तानाजी कुशाप्पा गोरुले वि. नाझीन आप्पासाहब हाबीब वगैरे )** |

सदरचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता कलम आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याकरीता दाखल केलेला आहे.

**०२.** प्रस्तुत कामी वादीचे कथन असे की, प्रस्तुत दावा वादीने प्रतिवादींविरुध्द कायम मनाई ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. तथापि सदर दावेमध्ये प्रतिवादी नंबर २–क जुबेदा मेहबुब मुल्ला असे नजरचुकीने नांव नमूद केलेल आहे. प्रस्तुत प्रतिवादी नंबर २–क चे खरे नांव जुबेदा उर्फ दिलशान मेहबुब मुल्ला असे आहे. तरी दावेमधील टायटल क्लॉजमधील प्रतिवादी नंबर २–क जुबेदा या शब्दानंतर उर्फ दिलशान हा मजकूर समाविष्ट करणेस परवानगी मिळणेविषयी विनंती केली आहे. सदरची दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची आहे. सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या मूळ स्वरुपात बदल होणार नाही. तसेच सदरची दुरुस्तीमुळे प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

**०३.** प्रस्तुत अर्जाचे कामी प्रतिवादी यांनी निशाणी ७४ वर म्हणणे दिले असून. प्रस्तुत प्रतिवादींचे म्हणणे असे की, यातील वादीने प्रतिवादी नंबर २ चे वारस रेकॉर्डवर आणत असताना त्यांचे वारसाच्या नावाची खात्री करुनच त्यांचे वारस रेकॉर्डवर आणणे आवश्यक होते. परंतू वादीने तसे या कामी केलेचे दिसून येत नाही. त्याचप्रमाणे प्रतिवादी नंबर २–क चे दिले नाव जुबेदा उर्फ दिलशान आहे याबाबतचा पुरावाही या कामी हजर केला नाही. त्यामुळे वादीचा अर्ज खर्चासह नामंजूर करणेविषयी विनंती केली आहे.

**०४.** प्रस्तुतचा अर्जाचे अवलोकन केले आणि दोन्ही बाजुचे विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. यावरुन खालील मुद्दे माझ्या पुढे उपस्थित झाले त्यावरील कारणांसहित निष्कर्ष खालील प्रमाणे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी यांनी मागीतलेल्या दुरुस्तीमुळे त्यांचे मुळ दाव्याचे स्वरुपात बदल होणार आहे काय ? | ...नाही |
| २. | सदरची दुरुस्ती ही मुळ दाव्याच्या अंतिम निकालाकरीता आवश्यक आहे काय ? | ....होय |
| ३. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## –कारणमिमांसा–

०५. प्रस्तुत दावा, तसेच अर्ज व दोन्ही विधीज्ञांचा युक्तीवादाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा हा वादीने कायम मनाईकरीता दाखल केला आहे. वादीच्या विधीज्ञांनी त्यांचे युक्तीवादा दरम्यान कथन केले की, प्रतिवादी क्रमांक २–क यांना समन्स लागू करतेवेळी त्यांनी त्यांचे नांव जुबेदा उर्फ दिलशान मेहबुब मुल्ला असे सांगितले आहे. परंतू समन्स निशाणी ६९ वर त्यांचे नांव जुबेदा मेहबुब मुल्ला असे असलेने त्यांनी समन्स स्वीकारले नाहीत. यावर प्रतिवादीचे विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, वादीने प्रतिवादी क्रमांक २–क चे नांव जुबेदा उर्फ दिलशान आहे याबाबत कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. प्रस्तुत प्रकरणाचे तसेच दोन्ही विधीज्ञांचे युक्तीवादाचे अवलोकन केले. प्रतिवादीच्या विधीज्ञांनी त्यांचे युक्तीवादा दरम्यान प्रतिवादी क्रमांक २–क चे नांव जुबेदा उर्फ दिलशान असल्याबाबत नाकारलेले नाही. त्यामुळे कबूल केलेली तथ्ये ही शाबीत करणेची आवश्यकता नसते. त्यामुळे प्रस्तुत अर्जामध्ये मागितलेली दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपात बदल होणार नाही. तसेच पक्षकारामध्ये वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णित करण्यासाठी मदत होणार आहे. दुरुस्तीस

मंजूरी दिल्यास दाव्यातील गुंतागुंत कमी होणार आहे. उलटपक्षी प्रस्तुत अर्ज नामंजूर केल्यास वादी व प्रतिवादीमधील दाव्यांची संख्या वाढून अनेकविध होण्याची शक्यता आहे. तसेच प्रतिवादी यांना पुरावा देणेची संधी असलेने सदर दुरुस्तीमुळे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच वादीने दावा दाखल करतेवेळी दाव्यामध्ये योग्य अशी कथने नमूद करण्यास संधी होती. परंतू दाव्यास झालेल्या विलंबासाठी वादी यांना खर्चाबाबत आदेश करणे योग्य होईल. **त्यामुळे मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी व मुद्दा क्र.२ चे उत्तर होकारार्थी नोंदवून, मुद्दा क्र.३ करिता खाली आदेश पारीत करते.**

## – आदेश –

१. वादीचा प्रस्तुत अर्ज (निशाणी ५४) हा प्रतिवादीस र.रु.२००/– (रक्कम रुपये दोनशे फक्त) देणेचे अटीवर मंजूर करणेत येत आहे.

२. वादीने सदरची दुरुस्ती या आदेशाचे तारखेपासून १४ दिवसांचे आत करणेची आहे.

३. वादीने सदर दाव्याची दुरुस्त प्रत द्यावी.

Digitally signed by Snehal Nivasrao Nikam
Location: Gadhinglaj
Date: 2021.02.10 17:49:31 +0530

दिनांकः– ०९ /०२/२०२१ **( श्रीमती एस.एन.निकम)**
गडहिंग्लज ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,गडहिंग्लज